# बॅक टु कॉलेज

वयाच्या त्रेसष्टाव्या वर्षी मी पुन्हा एकदा कॉलेज विद्यार्थिनी होईन असं मला वाटलं नव्हतं. पण ते तसं घडल खरं. या वयात कॉलेजमध्ये जाते तेव्हा मुंबई विश्वविद्यालयाच्या कालिना कॅम्पसमधली हिरवाईतून येणारी झुळूक मला ताजंतवानं करते.

म्हणजे त्याचं असं झालं की गेल्या वर्षी मी कॅलिफोर्नियातील ईस्ट बे मधील प्लेझंटन येथे माझ्या मुलीकडे तीन महिने गेले होते. त्यावेळी माझा नातू सातवीत होता आणि शाळेत त्याला पहिल्या वर्षीचं स्पॅनिश शिकवायला सुरुवात झाली होती. कधीपासून माझ्या मनात एक विचार घोळत असायचा की आपण एखादी युरोपियन भाषा शिकावी. मात्र हे भाषाभ्यासाचं बीज माझ्या मनात, वैराण जमिनीवर पडावं तसं पडून होतं. अचानक अमेरिकेला जाणं पुढे येऊन ठाकलं तेव्हाच ठरवलं या वास्तव्यात युरोपियन भाषा शिकायची. कोणती? तर नातू सातवीतल्या वर्षी जी भाषा निवडेल ती. थोडक्यात अमेरिकेत जाऊन स्वतःचं 'होम स्कूलींग' करायचं कारण मुलगी-जावई-नातू हे त्रिकूट असणार दिवसभर बाहेर.

कल्पवृक्षाखाली बसून केलेला विचार प्रत्यक्षात उतरल्यासारखंच झालं. 'Realidades' या नावाचं रंगीत, गुळगुळीत, आकर्षक मुखपृष्ठाचं क्रमिक पुस्तक; दोनशेब्याण्णव पानाचं ते पुस्तक हातात पडलं आणि मी हरखून गेले. परकीय भाषा शिकवणारं असं पुस्तक यापूर्वी हातात पडलं नव्हतं कधी. मग काय? घरात एकटी असताना रोज माझा स्वशिक्षणाचा नियमित क्लास सुरू झाला. त्या पुस्तकात स्पॅनिश भाषा इंग्लिश माध्यमातून छानच शिकवली होती. जगातल्या एकूण बावीस देशात स्पॅनिश बोलली जाते. त्या देशांना स्पॅनिश आक्रमणापूर्वीची त्यांची त्यांची पुरातन संस्कृती आहे. आता त्यातले बरेचसे देश भारताप्रमाणेच विकसनशील आहेत त्यामुळे त्यांचे बरेचसे प्रश्न आपल्यासारखेच आहेत. त्यांची गाणी आणि नृत्यं आकर्षक आहेत. त्यांच्यातले चित्रकार, नट जगप्रसिद्ध आहेत. एवढच नव्हे तर तेथील क्रांतीकारकांनी आपल्या देशातील क्रांतीकारकांप्रमाणे त्याग केला आहे. या सर्व बाबींची थोडक्यात ओळख Realidades या पुस्तकातील चौकटीतील मजकुराने होऊ लागली. या उघडलेल्या किलकिल्या दारातून आणखी पुढे जावं असं वाटू लागलं.

तीन महिन्यात पुस्तक वाचून पूर्ण केलं तेव्हा अशी अशी अक्षरं रोमन लिपित लिहिली की त्याचा असा असा अर्थ होतो हे कळू लागलं. पण उच्चार समजण्यासाठी नवी भाषा कानावरूनच जावी लागते. मग मी टी.व्ही. वर स्पॅनिश चॅनल्स बघू लागले. त्यातलं जलद गतीनं चालणारं संभाषण मला समजेना. मध्ये मध्ये दाखवल्या जाणाऱ्या जाहिराती मात्र समजत कारण त्या इंग्लिशमध्ये पाहिलेल्या असत. तीन ते पाच वर्षाची मुलं जाहिरातींकडे का आकर्षित होतात ते मला उमजलं. आता मी त्रेसष्ट वर्षाचं मूलच तर होते स्पॅनिशच्या बाबतीत.

मात्र असं असूनही सामाजिक प्रश्न समजणारी प्रौढ व्यक्तीही होते ना मी! त्यामुळे अमेरिकेतील मेक्सिकन लोकांचे रोजगाराचे प्रश्न मला समजू लागले. त्याचप्रमाणे त्यांची या प्रश्नाकडे बघण्याची स्वतःविषयीची भूमिका वेगळी आणि त्यांच्या मेक्सिकोमध्ये ग्वाटेमाला, एल् साल्वादोर अशा अधिक मागासलेल्या देशातून येणाऱ्यांसाठीची भूमिका वेगळी हा दुटप्पीपणा समजू लागला. नकळत या सगळ्याची तुलना भारतातल्या प्रश्नांशी होऊ लागली. अर्थातच स्पॅनिश भाषा शिकण्याच्या गोडीला नवीन परिमाण प्राप्त झालं. स्पॅनिश भाषा कानावरून जात नाही असा उल्लेख माझ्या बोलण्यात आल्यानं जावयानं मला स्पॅनिश ऑडिओ कॅसेटची भेट दिल्यानं भाषा कानावरून जाण्यास मदत झाली.

एक विचार पक्का झाला. भारतात परतल्यावर स्पॅनिश शिकण्यासाठी युनिव्हर्सिटीत प्रवेश घ्यायचा. आणि काय म्हणता! भारतात परतल्यावर पंधरा दिवसात मुंबई युनिव्हर्सिटीची स्पॅनिश सर्टिफिकेट कोर्सची जाहिरात वर्तमानपत्रात झळकली. यंदाचं विशेष म्हणजे स्पॅनिश शिकवायला स्पेनमधून शिक्षिका येणार होती. त्यामूळे जूनऐवजी ऑक्टोबरमध्ये कोर्स सुरू झाला आणि जून ते सप्टेंबरच्या मुंबईतल्या पावसात ठाण्याहून कालिन्याला जाण्याच्या त्रासातून मी अनायासे सुटले. जन्माचा दाखला आणि पदवी प्रमाणपत्र घेऊन त्रेचाळीस वर्षानंतर विद्यापीठाच्या प्रांगणात पाऊल ठेवताना वयामुळे प्रवेश नाकारला जाईल की काय अशी धाकधूक मनात होती. पण पाच मिनिटात प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाल्यावर आयडेंटिटी कार्ड

मिळाल्यावर आणि कॉलेजमध्ये विद्यार्थिनी म्हणून वावरताना 'आजकल पाँव जमींपर नही पडते मेरे' असं काहीसं मला झालं. त्याचं कारणही तसंच होतं.

सोळाव्या वर्षी १९५९ मध्ये मी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला तेव्हा साध्या मुली भेदरलेल्या असत आणि धीट मुलींना आगाऊ समजलं जात असे. मुलं आणि मुली हे दोन वेगळ्या ग्रहावरचे प्राणी असल्यासारखं वातावरण असे. मुली मुलांकडे चोरून बघत तर मुलं वर्गात टवाळी करुन कागदी बाण मारत. कॉलेज कट्ट्यावर गटागटांनी बसून कॉमेन्टस् करत. वर्गात मुलांच्या दोन रांगा, मूलींची एक रांग. एकमेकांच्या हद्दीत कोणी जात नसे. कॅन्टीनमध्ये मुली एकट्या जात नसत आणि मुलांबरोबर जाणाऱ्या मुलींना लफडेबाज समजलं जाई. साडी हाच पेहेराव असे. एखादी मुलगी लांडा स्कर्ट घालून आली की अब्रह्मण्यम् समजलं जाई. पंजाबी सूट नव्हताच आणि जीन्स फक्त सिनेमात पहायला मिळत.

आता स्पॅनिशच्या वर्गात मी प्रौढ युवती म्हणून बसते ते वातावरण बदललं आहे याचा मला आनंद होतो. मुलं-मुली मोकळेपणाने आपापल्या मित्र-मैत्रिणींबरोबर एकत्र बसतात. सगळे जीन्स-टी शर्टस्-टॉप घालतात. गंमत वाटल्यावर सहजपणे एकमेकांना टाळ्या देतात. एकटे, मैत्रिणींबरोबर, मित्रांबरोबर कॅन्टीनमध्ये जातात. त्यांचं एकमेकात मिसळणं कृत्रिम नसतं. मुख्य म्हणजे आमची स्पॅनिश टीचर त्यांच्याच वयाची गोड मुलगी असल्याने वर्गात छान वातावरण असतं. त्यामुळे युनिव्हर्सिटीतील असुविधा आणि चावणारे डास यांचा त्रास जाणवत नाही. मी त्यांच्यात सामावली गेले याचं कारण तरुण मित्र-मैत्रिणींचा सुस्वभाव. याचं थोडं श्रेय मीही घेते कारण जशी मी बुरसटलेल्या विचारांची नाही तशी 'बुढ्ढी घोडी लाल लगाम' असं मी करत नाही. शिंग मोडून वासरात शिरत नाही. माझ्या वयाच्या मर्यादेची मला जाणीव असते. नवीन वातावरण मी स्वच्छ दृष्टीने बघू शकते हे माझ्या तरुण मित्र-मैत्रिणींना कळते. माझ्या वयाभोवतालची लक्ष्मणरेषा मी ओलांडत नाही.

आमची गोड स्पॅनिश टीचर स्पेनहून आलेली असून दोन महिन्यात आम्हाला आपलंसं करून घेण्यात यशस्वी ठरली आहे. स्पॅनिश शिकतानाची ताजीतवानी झुळूक मन प्रफुल्लित करत आहे. आता मी एकटी कॅन्टीनमध्ये जाऊ शकते आणि आजूबाजूची तरुणाई एखाद्या अदृश्य माणसासारखी enjoy करू शकते.

मंजुषा गोसावी
manjusha_gosavi@hotmail.com